## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०८/११/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७५/२०१२/जा.७८२, दिनांक ०७/११/२०१२ व ३०/११/२०१२.

३) मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक यांचे दिनांक १६/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजीचे अभिवेदन.

५) मे. अेस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर यांचे दिनांक ०३/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

६) अशोक परशुराम तुपे याचा दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस दिलेला लेखी जबाब.

७) मे. गजानन ट्रेडर्स, कर्जत, जिल्हा रायगड या ठिकाणी दिनांक १८/१२/२०१२ रोजी करण्यात आलेला पंचनामा.

८) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७५/२०१२/जा.९१८ दिनांक १९/१२/२०१२.

९) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २३/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७५/२०१२/जा. १५८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २७/०२/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

### (जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०२/११/२०१२ रोजी या कार्यालयाच्या दुसऱ्या पथकाने मे. पटेल कोल्ड स्टोरेज च्या अधिपत्याखालील वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., नवी मुंबई येथे धाड टाकली असता, उपस्थित व्यवस्थापक प्रशांत सुरेश पवार याने दिलेल्या जबाबात त्यांच्या वेअरहाऊसमध्ये मे. इस्कॉन फुड यांनी साठवणूक केलेला तांदळाचा साठ्यापैकी सदर संस्थेने निर्गमित केलेल्या आदेशानुसार तांदळाचा साठा हा मे. अेस इंटरनॅशनल येथे पाठवित असल्याचे सांगितल्यानुसार व त्याअनुषंगाने मे. अेस इंटरनॅशनल (Ace) येथे सदरचा

तांदळाचा साठा हा सफाई करुन गैरमार्गाने विक्री होत असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी मे. एस इंटरनॅशनल (Ace), प्लॉट नं. ए-७७८/१, एमआयडीसी, खैराने या ठिकाणी अचानक धाड टाकली असता, तेथे उपस्थित असलेल्या कामगाराने त्याचे नांव लाला मुन्ना चौधरी असे सांगून आज कंपनी बंद असल्याने मालक हजर नाहीत व त्यांना बोलावून घेतो असे सांगितले. त्यास अधिकाऱ्यांनी त्यांच्या व पंचांच्या ओळखी करुन देऊन सदर ठिकाणी येण्याचे प्रयोजन सांगून सदर कामी मदत करण्याची विनंती केली.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंच व लाला मुन्ना चौधरी समक्ष सदर कंपनीत असलेल्या साठ्याची पहाणी करुन साठ्यामध्ये तांदूळ व गहू या जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असल्याने त्याचेकडे साठ्याच्या कागदपत्राबाबत मागणी केली असता, त्याने ती मालकाकडे असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळी असलेल्या साठ्याची तपासणी केली असता, प्लॅस्टिकचे बारदान असलेल्या गोण्यांमध्ये तांदूळ-गव्हाचा साठा तसेच जूटच्या बाचक्यांपैकी काही बाचक्यांवर एफ.सी.आय. चा छापा असलेल्या गोण्या दिसून आल्या. त्यामुळे सदरच्या साठ्यामध्ये रेशनिंगचा तांदूळ, गहू असल्याची शक्यता वाटल्यावरुन अधिकाऱ्यांनी उपस्थित कामगाराकडे साठ्याची खरेदीबिले, शिधावाटप विभागाचा साठवणूकीसाठी आवश्यक असणारा परवाना इत्यादी बाबत चौकशी करुनही ते माहिती देऊ शकले नाहीत. त्यानंतर थोड्या वेळाने कंपनीमध्ये पंकज ठक्कर नावाची व्यक्ती हजर होऊन ते कंपनीचे मालक असल्याचे सांगितल्यावरुन त्यांना घटनास्थळी असलेल्या तांदूळ-गव्हाच्या साठ्याची वरीलप्रमाणे कागदपत्रे सादर करण्यास विनंती केली असता, त्यांचेकडे नमूद साठ्याची खरेदी बिले तसेच साठवणूकीचा घाऊक परवाना/किरकोळ परवाना घेतला नसल्याचे पंचांसमक्ष सांगितले. यावरुन सदरचा साठा हा विना खरेदी बिले, विनापरवाना साठवणूक केलेला साठा असल्याचे दिसून आले.

उपस्थित पंकज ठक्कर याचेकडे अधिक चौकशी केली असता, त्यांनी असे सांगितले की, सदरचे प्लांटमध्ये ते विविध व्यापाऱ्यांचा तांदूळ व गव्हाचा साठा सफाईची प्रक्रिया करुन त्यांचेकडे असलेल्या मशिन शिलाईने नवीन बारदानामध्ये पॅकिंग करुन देण्याचे कामकाज करीत असून प्लांटमध्ये येण्याऱ्या साठ्याची त्यांचेकडे असलेल्या आवक रजिस्टरमध्ये नोंद घेतात. परंतू साठ्याबाबतची कोणतीही कागदपत्रे ते घेत नसल्याचे त्यांनी सांगितले व कंपनीत असलेल्या साठ्याबाबत असा खुलासा केला की, मे. स्नेहा ट्रेडिंग कंपनीचा दिनांक २२/०९/२०१२ रोजी २०० बाचकी ५० कि.ग्रॅ. वजनाच्या गव्हाच्या बाचक्या ठेवलेल्या होत्या. त्यापैकी बराच साठा सफाई करुन घेऊन गेले आहेत व शिल्लक राहिलेला तुकडा गहू व भुसा असा एकूण ३३.६० क्विंटल आहे. तर मे. मेट्रो इंटरनॅशनल यांचे मार्फत आलेला ९६ क्विंटल गव्हाच्या साठ्याचे कोणतेही कागदपत्र उपलब्ध नसल्याचे सांगितले. मे. गजानन ट्रेडिंग कंपनी यांचा ३२०६ बाचक्यातील १६०३ क्विंटल तांदळाच्या साठ्याची कोणतीही कागदपत्रे त्यांचेकडे नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांना पंचांसमक्ष उपरोक्त मे. स्नेहा ट्रेडिंग कंपनी, मे. मेट्रो इंटरनॅशनल व मे. गजानन ट्रेडिंग

कंपनीच्या संबंधितांना परवाना व साठ्याची कागदपत्रे घेऊन येण्याच्या सुचना दिल्या असता, त्यापैकी स्नेहा ट्रेडिंगचे प्रतिनिधी यांनी उपस्थित राहून दिनांक १२/०९/२०१२ व १४/०९/२०१२ रोजीची रिलिज ऑर्डर क्र. ००४०४१ व ००४०६० नुसार फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कळंबोली पनवेल यांचेकडून घेतलेल्या साठ्याचे चलन दाखविले. त्याची पाहणी केली असता, एकूण १०० मे. टन साठा नमूद असल्याचे दिसून आले. स्नेहा ट्रेडिंगचे प्रतिनिधीकडे चौकशी केली असता, त्यांनी असे सांगितले की, संदरच्या ठिकाणी त्यांनी २०० (दोनशे) बाचकी १०० क्विंटल साठा ठेवला होता. त्यापैकी बराच साठा ते घेऊन गेले आहेत व सदरच्या गोदामात असलेल्या साठ्यापैकी ९६ बाचके तुकडे गहू घेऊन जाणे व शिल्लक असल्याचे सांगितले. तसेच कार्यवाही पूर्ण होईपर्यंत ही उर्वरीत दोन व्यापारी ट्रेड नांवे असलेल्या मेट्रो इंटरनॅशनल व गजानन ट्रेडिंग कंपनीचे कोणीही मालक अथवा प्रतिनिधी, व्यवस्थापक इत्यादी उपस्थित होऊन सदरच्या ठिकाणचा साठा हा त्यांचा असल्याचे व साठ्याची अधिकृत कागदपत्रे सादर केलेले नाहीत.

घटनास्थळी आढळून आलेल्या पूर्ण तांदळाचा साठा १६०३ क्विंटल बाबत व ९६ क्विंटल गव्हाबाबत पंकज ठक्कर यांनी सांगितलेल्या व्यापारी नांवे असलेल्या फर्मने उपस्थित राहून खरेदी बिले, साठवणूक परवाना इत्यादी काहीही सादर केलेले नसल्याने तसेच पंकज ठक्कर हेही कोणतेही कागदपत्र सादर करुन शकले नसल्याने वरील साठा हा बेकायदेशिररित्या अनधिकृतपणे विनापरवाना, विना बिले बाळगला असल्याचे स्पष्ट होत असल्याने वरील साठा जागीच जप्त करुन मुद्देमाल म्हणून ताब्यात घेण्यात आला.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साठ्याचे वर्णन | नग | भरती | साठा | जप्त मुद्देमालाची बाजारभावाने प्रमाणे अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्लॅस्टिक बारदानामधील तांदळाचा साठा | २८५० | ५० कि.ग्रॅ. | १४२५ क्विंटल | ३५,६२,५००/- |
| २ | एफ.सी.आय.च्या जुट बारदानातील तांदळाचा साठा | २४० | ५० कि.ग्रॅ. | १२० क्विंटल | ३,००,०००/- |
| ३ | एफ.सी.आय.च्या जुट बारदानातील कणी तांदळाचा साठा | ११६ | ५० कि.ग्रॅ. | ५८ क्विंटल | ६९,६००/- |
| ४ | प्लॅस्टिक बारदानामधील गव्हाचा साठा | ३२० | ३० कि.ग्रॅ. | ९६ क्विंटल | १,६३,२००/- |
| | | | | एकूण | ४०,९५,३००/- |

दरम्यानच्या कालावधीत तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे घटनेची वर्दी देण्यात आली. त्यानुसार पोलिस ठाण्याचे नाईक श्री. जी. एच. भुंडेरे बक्कल नं. १६६१ हे घटनास्थळी हजर झाले. त्यांना पंचाचे समक्ष घटनास्थळाची पाहणी करण्यास सांगितले असता त्यांनी घटनास्थळाची पाहणी करुन मुद्देमाल तपासून घेतला व

त्यानंतर उपस्थित इसम पंकज ठक्कर यांना पोलिसाचे ताब्यात देऊन सदर कंपनीचे लोखंडी मेनगेट बंद करण्यात आले व लोखंडी टाळें लावून ते सिलबंद करण्यात आले.

मे. पटेल कोल्ड स्टोरेजच्या अधिपत्त्याखालील मे. वेलवर्थ फुड प्रा.लि., ३६/१, तुर्भे एमआयडीसी, नवी मुंबई या वेअरहाऊसवर धाड टाकून मे. इस्कॉन फुड फाऊंडेशन रिलिफ या संस्थेने अनधिकृतरित्या शालेय पोषण आहार योजनेचा तांदळाचा साठा त्यांना नेमून दिलेल्या विभागातील केद्रींय स्वयपाकघरात साठवणूक न करता अवैध मार्गाने नमूद ठिकाणी साठवणूक करुन व त्यापैकीच साठा हा मे. एस इंटरनॅशनल (Ace) या कंपनीत पाठविला असल्याबाबत घटनास्थळी उपस्थित इसमांनी दिलेल्या जबाबामध्ये निष्पन्न झाल्याने संबंधित संस्थेचे शाखा व्यवस्थापक, मे. वेलवर्थ फुड प्रा.लि.चे संचालक तसेच मे. एस इंटरनॅशनल (Ace) चे मालक यांच्या विरोधात नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०४१/२०१२ अन्वये दिनांक ०३/११/२०१२ रोजी गुन्हा दाखल करुन रुपये २,२९,००,५००/- किंमतीचा ७६३३.५० क्विंटल तांदळाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अशाप्रकारे मे. एस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर व मे. गजानन कंपनी व मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक/भागीदार/व्यवस्थापक यांनी आपसात संगणमत करुन अन्नधान्य साठ्याची अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या विना खरेदी बिले, विनापरवाना साठवणूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ तसेच २) दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ मधील तरतुदींचा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द तुर्भे पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३११२/२०१२, दिनांक ०३/११/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यांनुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २९/११/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २९/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस तुर्भे पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. मालोजी शिंदे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. एस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज प्रागजी ठक्कर हे उपस्थित राहिले. परंतू त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही. तसेच सदर सुनावणीस मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक नरेंद्र कुमार नेमीचंद संतोषी यांनी उपस्थित राहून यापूर्वीच वाचावे क्र. ३ अन्वये टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले.



CONTROLLER

तथापी, सदर सुनावणीस मे. गजानन ट्रेडिंग कंपनीच्या वतीने कोणीही उपस्थित राहिले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १८/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली. 005

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. गजानन ट्रेडिंग कंपनीच्या वतीने अशोक परशुराम तुपे हे उपस्थित राहिले. परंतू लेखी निवेदन सादर केले नाही. तथापी, सदर प्रकरणी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगून मे. अेस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर यांनी सांगितल्यानुसार ते सुनावणीस उपस्थित राहिले असल्याचे सांगितले. सदरचा जप्त तांदळाचा साठा त्यांच्या मालकीचा नसून तो मे. अेस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर व कानजीभाई नामे इसमाने काळाबाजारीने मे. पटेल वेअरहाऊस येथून इस्कॉन फुडचे श्री. परती यांचेकडून शालेय पोषण आहाराचा तांदूळ काळेबाजारीने खरेदी केल्याचे सांगितले. सदर साठ्याकरिता त्यांनी मे. गजानन ट्रेडिंग या नावाचे बनावट पावती पुस्तक तयार करुन त्याची दिशाभूल केल्याचे सांगितले. सबब, अशोक परशुराम तुपे यांचा तसा वाचावे क्र. ६ अन्वये लेखी जबाब नोंदविण्यात आलेला आहे. दरम्यान सदर सुनावणीस उपस्थित पंकज ठक्कर व कानजीभाई नामे इसम हे न सांगता निघुन गेले. सदर प्रकरणी सुनावणीमध्ये घडलेल्या घटनाक्रमांची माहिती तपासी पोलिस अधिकारी यांना पुढील तपासासाठी सादर करण्यासाठी या कार्यालयाचे वाचावे क्र. ८ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे यांना पत्र निर्गमित करण्यात आले.

तत्पूर्वी मे. गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक अशोक परशुराम तुपे यांनी दिलेल्या लेखी जबाबानुसार त्यांनी यापूर्वीच सुमारे २ ते ३ वर्षापूर्वी कर्जत जिल्हा रायगड येथे करीत असलेला अन्नधान्याचा व्यवसाय बंद केला असल्याचे सांगितल्यानुसार या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील फिरते पथकाने कर्जत तहसिल कार्यालयाच्या पथकासमवेत मे. गजानन ट्रेडिंग कंपनी, कर्जत, जिल्हा रायगड या ठिकाणी स्थळभेट देऊन सदर बाबत खातरजमा करण्यात आली व तसा वाचावे क्र. ७ अन्वये पंचनामा करण्यात आला.

OFFICE
BAI

तद्नंतर वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे यांचे वाचावे क्र. ९ अन्वये प्राप्त झालेल्या पुढील तपासाच्या अहवालानुसार मे. अेस इंटरनॅशनल या ठिकाणी जप्त असलेला तांदळाचा साठा हा शालेय पोषण आहारचा असून सदरचा साठा मे. अेस इंटरनॅशनलचे मालक पंकज ठक्कर व कानजीभाई नामे इसमाने मे. इस्कॉन फुडस्चे व्यवस्थापक परती यांचेशी संगणमत करुन काळेबाजारीने खरेदी केल्याचे सिध्द झाले आहे, असे नमूद आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद :-</u>

मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक यांचे दिनांक १६/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, नमुद गोदामातील ९ मे. टन गव्हाचा साठा त्यांच्या मालकीचा असुन त्यांनी सदरचा साठा भारतीय खाद्य निगम यांचेकडून

खरेदी केलेला आहे. जप्त गव्हाच्या साठयाच्या पुराव्यादाखल वितरण आदेशाच्या छायांकित प्रती निवेदनासोबत जोडण्यात आली असुन मुळ कागदपत्रे हे ट्रकसोबत पाठविण्यात आले असुन सदरची कागदपत्रे सिलबंद असलेल्या गोदामात आहेत. त्यामुळे त्यांची विनंती मान्य करुन जप्त साठा मुक्त करण्यात यावा असे नमुद केले आहे.

दिनांक २९/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तुर्भे पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. मालोजी शिंदे यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील मुद्देमालाबाबत अटक आरोपी याने सांगितल्याप्रमाणे खात्री केली असता पाहिजे आरोपी क्रमांक १) मे. गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक अशोक परशुराम तुपे यांचेकडे मुद्देमालाबाबत चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी दिनांक ०७/०९/२०१२ रोजी प्रत्येकी १०० किलो वजनाच्या ५६० गोण्या दिनाक २४/१०/२०१२ रोजी प्रत्येकी ५० किलो वजनाची १००० गोणी, तसेच दिनांक २८/१०/२०१२ रोजी प्रत्येकी ५० किलो वजनाची १००० गोणी, असे सर्व मिळून एकूण २५६० गोण्या त्यामध्ये ५० किलो व १०० किलो वजनाच्या तांदळाच्या गोण्याचा माल हा सदर कंपनीत सफाईकरीता देण्यात आलेला आहे. दिनांक ०७/०९/२०१२ रोजीचे पाठविलेला मुद्देमाल ५६० गोण्या प्रत्येकी १०० किलो वजनाच्या त्याची बिले सादर केलेली नाहीत. दिनांक २४/१०/२०१२ रोजी पाठविलेल्या १००० गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या या मुद्देमालाच्या बिलाच्या झेरॉक्स प्रती तसेच दिनांक २८/१०/२०१२ रोजी १००० गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या या मुद्देमालाच्या बिलाच्या मुळ प्रती त्यांनी समक्ष सादर केल्या. त्यानुसार अशोक तुपे व त्याच्याकडे काम करणारा मॅनेजर नामे कांजी बंच्चू रावरीया यांचा सविस्तर जबाब नोंद करण्यात आलेला आहे. सदर बिलांबाबत कंपनीत पोलिस अधिकारी यांनी दिनांक २६/११/२०१२ रोजी दोन पंचासमक्ष जावून खात्री केली असता, सदर ठिकाणी मे. गजानन ट्रेडिंग कंपनी यांच्याकडील वरील प्रमाणे कोणतीही बिले मिळून आलेली नाहीत. त्यावेळी एसीए इंटरनॅशनल कंपनी यांच्याकडील मालाबाबतचे स्टॉक रजिस्टर ताब्यात घेऊन त्यामध्ये असे आढळून आले की, मे. गजानन ट्रेडिंग कंपनी यांनी एसीए इंटरनॅशनल कंपनीमध्ये साफसफाई करण्याकरीता दिनांक २६/१०/१२ रोजी एकूण ३००० गोण्या १५ ट्रकमध्ये पाठविल्याबाबत पत्र मिळाले. त्यापैकी काही माल ते साफसफाई करुन घेवुन गेले असल्याचे पंकज ठक्कर यांनी सांगितले. तसेच सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी क्र. २ मधील मे. मेट्रो ट्रेडिंग कंपनीचे मालक नरेंद्रकुमार नेमीचंद संचेती यांच्याकडे असलेल्या गव्हाची अधिक चौकशी करीता त्यांनी सांगितले की, दिनांक २७/०९/२०१२ रोजी त्यांनी फुड कॉरपोरेशन ऑफ इंडिया (एफ.सी.आय.) बोरीवली मुंबई यांच्याकडून एकूण ९ मेट्रीक टन गहू त्यामध्ये प्रत्येकी ५० किलो वजनाच्या एकूण १८० गोण्या या १,३२,३९० रुपयास विकत घेतल्या असून सदरचा माल हा जास्त जुना व खराब असल्याने साफसफाई करण्यासाठी एसीई इंटरनॅशनल कंपनीत देण्यात आले असल्याचे सांगितले. तसा त्याचा सविस्तर जबाब नोंद करण्यात आलेला आहे. सदर गव्हाबाबतची एसीई इंटरनॅशनल कंपनीत खात्री केली असता सदर कंपनीमध्ये प्रत्येकी ५० किलो वजनाच्या एकूण १८० गोण्याची बिले मिळून आली. तसेच फुड कॉर्पोरेशन ऑफ

इंडिया (एफ.सी.आय.) यांच्याकडून दिनांक ११/०९/२०१२ रोजी खरेदी केलेल्या गव्हाची बिले मिळून आलेली असून ती तपासकामी ताब्यात घेण्यात आलेली आहे. तरी सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाबाबत योग्य तो आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

मे. एस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर यांचे दिनांक ०३/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक ०२/११/२०१२ रोजी आपल्या कार्यालयाच्या पथकाने त्याच्या व्यवसायाच्या जागेत तांदळाचा साठा सफाई करुन गैरमार्गाने विक्री होत असल्याबाबत अचानक धाड टाकून त्याच्या व्यवसायाच्या जागेत निवेदनासोबत जोडण्यात आलेल्या दि.०७/११/२०१२ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे व तो मुद्देमाल त्याचा नसून तो अन्य संबंधित कंपन्यांचा आहे. आपण केलेल्या संदरहू कारवाईत त्याची व्यवसायाची जागा बंद करुन सील करण्यात आली आहे. त्यामुळे त्याचे जागेचे भाडे, व्याज, कामगारांचा पगार या स्वरुपात त्याला रक्कम अदा कराव्या लागत असल्यामुळे अतोनात नुकसान होत आहे. त्याप्रमाणे त्याच्या जागेत तो वापर करीत असलेल्या विजेचे सरासरी देयकाचा भरणा करावा लागत आहे. सदरहू व्यवसायाची जागा बंद असून देखील ज्या कंपन्यांचा सदरहू मुद्देमाल त्याच्याकडे त्याच्या सदरहू व्यवसायाच्या जागेत पडून आहे त्यांना देखील त्याच्याबद्दल खूप वाईट वाटत आहे. त्याच्या ग्राहकांना संबंधित माल पोच करणे संदरहू जागा बंद असल्याकारणाने शक्य झालेले नाही. तो त्याच्या व्यवसायाच्या जागेत आपल्या कारवाईच्या वेळेस आढळून आलेला संबंधित तांदळाच्या व गव्हाच्या मुद्देमालास तो अथवा त्याचे कामगार अथवा दुसरी कोणतीही व्यक्ती स्पर्श करणार नाही व आपली संपूर्ण कारवाई पूर्ण होईपर्यंत तो मुद्देमाल त्याच्या सदरहू व्यवसायाच्या जागेत सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी त्याची असेल तसेच जोपर्यंत सदरहू प्रकरणी पूर्ण कार्यवाही होऊन निर्णय लागत नाही तोपर्यंत तो आपणास योग्य ते सर्व सहकार्य करीन. तरी त्याची बंद असलेली व्यवसायाची जागा उघडून पुन्हा त्याच्या सदरहू व्यवसाय सुरु करण्यासाठी सदरहू बंद असलेली व्यवसायाची जागा योग्य ते आदेश देऊन उघडण्याची आणि त्याचा संबंधित व्यवसाय तेथे करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती केली आहे.

अशोक परशुराम तुपे यांनी दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस दिलेल्या लेखी जबाबात, मे. एस इंटरनॅशनल या कोल्ड स्टोरेजमध्ये मे. गजानन ट्रेडिंग कंपनीच्या नावे तांदळाचा साठा अनधिकृतरित्या ठेवण्यात आला. सदरची गजानन ट्रेडिंग कंपनी ही त्याच्या स्वमालकीची आस्थापना होती. सदर आस्थापनेमधून त्याच्या मालकीच्या श्री गजानन राईस मिलमध्ये शेतकऱ्यांकडून भात खरेदी करुन त्या पासून तांदूळ तयार करुन गजानन ट्रेडिंग कंपनीद्वारे व्यापाऱ्यांना विक्री करीत होतो. सदरचा व्यवसाय तो १९८७ पासुन करीत होता. श्री. कानजी भाई हे त्याच्या राईस मिलमध्ये २००३ ते २००९ या कालावधीपर्यंत कामगार म्हणून काम करीत होता. तसेच व्यवसायाचे हिशोब लिहणे, खरेदी विक्री बिले फाडणे हे देखील तो काम करीत होता. परंतू त्याच्या प्रकृतीमुळे सदरचा व्यवसाय सन २००९ साली संपूर्णपणे बंद केला. मे. एस कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवण्यात आलेल्या तांदळाच्या साठ्याबाबत

त्याचा काहीही संबंध नाही. सदर साठ्याबाबत त्याच्या गजानन ट्रेडिंग कंपनीच्या नावे बोगस बिल बुके छापून त्याद्वारे श्री. कानजीभाई या व्यक्तीने व्यवहार केला. कानजीभाई हा त्याच्याकडे दोन तीन वर्ष कामास होता. सदर व्यक्तीने पंकज ठक्करच्या साथीने सदरचा गैरव्यवहार केला. सदरच्या व्यवहाराशी त्याचा काहीही संबंध नाही. कानजीभाई यास त्याने मे. एस इंटरनॅशनल येथे साठवणूक असलेला तांदळाचा साठा व सदर साठ्यात त्याचे नांव जाणून बूजून का गोवले याबाबत विचारणा केली असता, त्याने पंकज ठक्कर याचेशी संगणमत करुन मे. एस इंटरनॅशनल या वेअरहाऊसमध्ये शालेय पोषण आहार योजनेचा जप्त असलेला तांदळाचा साठा मे. पटेल वेअर हाऊस येथील साठा इस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री. परती यांचेकडून काळ्याबाजाराने खरेदी केल्याचे सांगितले व सदरचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे भासविण्यासाठी गजानन ट्रेडिंग कंपनी या नांवाचे खोटे पावती पुस्तक छापून गैरवापर केल्याचे त्याला सांगितले, असे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २३/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्यात श्री गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक श्री. अशोक परशुराम तुपे यांचेकडे दिनांक १५/०१/२०१३ रोजी पुन्हा पोलिस ठाणेस बोलावून त्याचेकडे सदर गुन्ह्याबाबत अधिक चौकशी केली असता, त्याने सांगितले की, त्याचे मालकीची श्री गजानन ट्रेडिंग कंपनी ही त्याने सन २००९ पासून बंद केलेली आहे. त्यामुळे त्याचा सन २००९ पासून सदर कंपनीच्या कोणत्याही मालाच्या खरेदी विक्रीच्याबाबत संबंध राहिलेला नाही. तसेच गुन्ह्यातील त्याचे कंपनीचे नावे असलेला एकूण २५६० तांदळाच्या गोण्या त्यामध्ये ५० किलो व १०० किलो वजनाचा माल हा कानजी बंच्चू रावरीया याने त्याचे कंपनीचे लेटर पॅड तयार करुन तो माल त्या लेटर पॅडद्वारे एस इंटरनॅशनल कंपनी येथे साफसफाई करण्यासाठी पाठविला आहे, असे नमूद आहे. सदरच्या मालाशी त्याचा काहीएक संबंध नाही. सदरचा तांदूळ हा कानजीभाई बंच्चू रावरीया व पंकज ठक्कर यांनी मिळून शालेय पोषण आहार योजनेचा मे. पटेल वेअर हाऊस येथील ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केलेला आहे. तसेच सदरचा जप्त केलेला तांदळाचा साठा हा खुल्या बाजारामधील भासविण्यासाठी त्याचे कंपनीच्या नांवाचे खोटे पावती पुस्तक छापून कानजीभाई रावरीया व एस इंटरनॅशनचे मालक पंकज ठक्कर यांनी सदर मालाचा गैरवापर केलेला आहे. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल व झाले व्यवहाराशी त्याचा काहीएक संबंध नाही. त्याने यापुर्वी दिनांक ०५/११/२०१२ रोजी दिलेला जबाब हा कानजीभाई हा त्याचेकडे यापूर्वी नोकरी करीत होता. त्यामुळे त्याचेवर विश्वास ठेऊन त्याचे सांगणेप्रमाणे दिला होता. सदरचा जबाब चुकीचा आहे. अशा प्रकारची हकीकत सांगितल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंद करुन मुळ कागदपत्रात सामील करण्यात आलेला आहे. त्यानंतर सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे कानजीभाई बंच्चू पटेल उर्फ रावरीया याचा शोध घेऊन त्यास दिनांक १६/०१/२०१३ रोजी अटक करुन त्याचेकडे सदर गुन्ह्याबाबत अधिक विचारपुस केली असता, त्यानेही अशोक परशुराम तुपे यांचेसारखी मिळतीजुळती हकीकत सांगून पंकज ठक्कर यांनी सदरचा माल हा मे. पटेल वेअरहाऊस

नेरुळ येथील असून ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केलेला आहे. सदरचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे भासविण्यासाठी गजानन ट्रेडिंग कंपनी याचे बनावट लेटर पॅड वापरुन व दाहोद गुजरात येथील सनवालीया ट्रेडिंग कंपनी येथून खरेदी केल्याची बनावट बिले आणून पंकज ठक्कर यांचेशी संगणमत करुन आणले असल्याचे कानजीभाई याने कबूल केलेले आहे. एंकदरीत झाले तपासामध्ये नमुद अटक आरोपींतांनी आपसात संगणमत करुन सदरचा जप्त मुद्देमाल हा दाहोद गुजरात येथून गजानन ट्रेडिंग कंपनी कर्जत यांनी खरेदी केल्याचे दाखवून त्यांची बनावट बिले व गजानन ट्रेडिंग कंपनी कर्जत ही सन २००९ मध्ये बंद झाली असतानाही त्याचे बनावट लेटर पॅड वापरुन घटनास्थळी आणून ठेवल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे सदर गुन्ह्यामध्ये भादवि कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ हे कलम दिनांक १७/०१/२०१३ रोजी वाढविण्यात आलेले आहे. तरी सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाबाबत योग्य तो आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

## <u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०२/११/२०१२ रोजी या कार्यालयाच्या दक्षता पथकाने मे. पटेल कोल्ड स्टोरेज च्या अधिपत्त्याखालील वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., नवी मुंबई येथे धाड टाकली असता, उपस्थित व्यवस्थापक प्रशांत सुरेश पवार याने दिलेल्या जबाबात त्यांच्या वेअरहाऊसमध्ये मे. इस्कॉन फुड यांनी साठवणूक केलेला तांदळाचा साठ्यापैकी सदर संस्थेने निर्गमित केलेल्या आदेशानुसार तांदळाचा साठा हा मे. ऐस इंटरनॅशनल येथे पाठवित असल्याचे सांगितल्यानुसार व त्याअनुषंगाने मे. ऐस इंटरनॅशनल (Ace) येथे सदरचा तांदळाचा साठा हा सफाई करुन गैरमार्गाने विक्री होत असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी मे. ऐस इंटरनॅशनल (Ace), प्लॉट नं. अे-७७८/१, एमआयडीसी, खैराने या ठिकाणी अचानक धाड टाकली असता, मे. ऐस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर व मे. गजानन कंपनी व मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक/भागीदार/व्यवस्थापक यांनी आपसात संगणमत करुन अन्नधान्य साठ्याची अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या विना खरेदी बिले, विनापरवाना साठवणूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ तसेच २) दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज़ होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ मधील तरतुदींचा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द तुर्भे पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३११२/२०१२, दिनांक ०३/११/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन ३२०६ गोण्यांमधील १६९३ क्विंटल तांदळाचा व ३२०

गोण्यांमधील ९६ क्विंटल गव्हाचा साठा असा मिळून एकूण ४०,९५,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मे. पटेल कोल्ड स्टोरेजच्या अधिपत्याखालील मे. वेलवर्थ फुड प्रा.लि., ३६/१, तुर्भे एमआयडीसी, नवी मुंबई या वेअरहाऊसवर धाड टाकून मे. इस्कॉन फुड फाऊंडेशन रिलिफ या संस्थेने अनधिकृतरित्या शालेय पोषण आहार योजनेचा तांदळाचा साठा त्यांना नेमून दिलेल्या विभागातील केंद्रींय स्वयंपाकघरात साठवणूक न करता अवैध मार्गाने नमूद ठिकाणी साठवणूक करुन व त्यापैकीच साठा हा मे. अेस इंटरनॅशनल (Ace) या कंपनीत पाठविला असल्याबाबत घटनास्थळी उपस्थित इसमांनी दिलेल्या जबाबामध्ये निष्पन्न झाल्याने संबंधित संस्थेचे शाखा व्यवस्थापक, मे. वेलवर्थ फुड प्रा.लि.चे संचालक तसेच मे. अेस इंटरनॅशनल (Ace) चे मालक यांच्या विरोधात नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०४१/२०१२ अन्वये दिनांक ०३/११/२०१२ रोजी अलाहिदा गुन्हा दाखल करुन ७६३३.५० क्विंटल तांदळाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

मे. अेस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्याच्या व्यवसायाच्या जागेत तांदळाचा साठा हा मे. गजानन ट्रेडिंग कंपनी व गव्हाचा साठा हा मे. मेट्रो इंटरनॅशनल यांच्या मालकीचा असल्याची बाब त्यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात नमूद केली आहे.

तथापी, दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक अशोक परशुराम तुपे यांनी दिलेल्या लेखी जबाबात, मे. अेस इंटरनॅशनल या कोल्ड स्टोरेजमध्ये मे. गजानन ट्रेडिंग कंपनीच्या नावे तांदळाचा साठा अनधिकृतरित्या ठेवण्यात आला असल्याचे सांगून सदरची गजानन ट्रेडिंग कंपनी ही त्याच्या स्वमालकीची आस्थापना होती. श्री. कानजी भाई हे त्याच्या राईस मिलमध्ये २००३ ते २००९ या कालावधीपर्यंत कामगार म्हणून काम करीत होता. परंतू त्याच्या प्रकृतीमुळे सदरचा व्यवसाय सन २००९ साली संपूर्णपणे बंद केला. मे. अेस कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवण्यात आलेल्या तांदळाच्या साठ्याबाबत त्याचा काहीही संबंध नाही. सदर साठ्याबाबत त्याच्या गजानन ट्रेडिंग कंपनीच्या नावे बोगस बिल बुके छापून त्याद्वारे कानजीभाई या व्यक्तीने पंकज ठक्करच्या साथीने सदरचा गैरव्यवहार केला. कानजीभाई यास त्याने मे. अेस इंटरनॅशनल येथे साठवणूक असलेला तांदळाचा साठा व सदर साठ्यात त्याचे नांव जाणून बूजून का गोवले याबाबत त्याने श्री. कानजीभाई याचेकडे विचारणा केली असता, त्याने पंकज ठक्कर याचेशी संगणमत करुन मे. अेस इंटरनॅशनल या वेअरहाऊसमध्ये शालेय पोषण आहार योजनेचा तांदळाचा साठा मे. पटेल वेअर हाऊस येथील इस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री. परती यांचेकडून काळ्याबाजाराने खरेदी केल्याचे सांगितले व सदरचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे भासविण्यासाठी गजानन ट्रेडिंग कंपनी या नांवाचे खोटे पावती पुस्तक छापून गैरवापर केल्याचे त्याला कानजीभाई याने सांगितले, असे नमूद केले आहे. सदर जबाबाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना पत्र निर्गमित करुन पुढील तपासाच्या सुचना दिल्या असता, त्यांनी केलेल्या पुढील

तपासाच्या अनुषंगाने टपालामार्फत सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यात श्री गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक श्री. अशोक परशुराम तुपे यांचेकडे दिनांक १५/०१/२०१३ रोजी पुन्हा पोलिस ठाणेस बोलावून त्याचेकडे सदर गुन्ह्याबाबत अधिक चौकशी केली असता, त्याने सांगितले की, त्याचे मालकीची श्री गजानन ट्रेडिंग कंपनी ही त्याने सन २००९ पासून बंद केलेली आहे. त्यामुळे त्याचा सन २००९ पासून सदर कंपनीच्या कोणत्याही मालाच्या खरेदी विक्रीच्याबाबत संबंध राहिलेला नाही. तसेच गुन्ह्यातील त्याचे कंपनीचे नावे असलेला एकूण २५६० तांदळाच्या गोण्या त्यामध्ये ५० किलो व १०० किलो वजनाचा माल हा कानजी बंच्चू रावरीया याने त्याचे कंपनीचे लेटर पॅड तयार करुन तो माल त्या लेटर पॅडद्वारे अेस इंटरनॅशनल कंपनी येथे साफसफाई करण्यासाठी पाठविला आहे, असे नमूद आहे. सदरच्या मालाशी त्याचा काहीएक संबंध नाही. सदरचा तांदूळ हा कानजीभाई बंच्चू रावरीया व पंकज ठक्कर यांनी मिळून शालेय पोषण आहार योजनेचा मे. प्टेल वेअर हाऊस येथील ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केलेला आहे. तसेच सदरचा जप्त केलेला तांदळाचा साठा हा खुल्या बाजारामधील भासविण्यासाठी त्याचे कंपनीच्या नावाचे खोटे पावती पुस्तक छापून कानजीभाई रावरीया व अेस इंटरनॅशनचे मालक पंकज ठक्कर यांनी सदर मालाचा गैरव्यवहार केलेला आहे. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल व झाले व्यवहाराशी त्याचा काहीएक संबंध नाही. अशा प्रकारची हकीकत सांगितल्याने त्याचा सविस्तर जबाब नोंद करुन मुळ कागदपत्रांत सामील करण्यात आलेला आहे. त्यानंतर सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे कानजीभाई बंच्चू पटेल उर्फ रावरीया याचा शोध घेऊन त्यास दिनांक १६/०१/२०१३ रोजी अटक करुन त्यांचेकडे सदर गुन्ह्याबाबत अधिक विचारपुस केली असता, त्यानेही अशोक परशुराम तुपे यांचेसारखी मिळतीजुळती हकीकत सांगून पंकज ठक्कर यांनी सदरचा माल हा मे. पटेल वेअरहाऊस, नेरुळ येथील असून ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केलेला आहे. सदरचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे भासविण्यासाठी गजानन ट्रेडिंग कंपनी याचे बनावट लेटर पॅड वापरुन व दाहोद गुजरात येथील सनवालीया ट्रेडिंग कंपनी येथून खरेदी केल्याची बनावट बिले आणून पंकज ठक्कर यांचेशी संगणमत करुन आणले असल्याचे कानजीभाई याने कबूल केले असल्याचे नमूद आहे. सबब, जप्त तांदळाचा साठा हा गैरमार्गाने खरेदी करुन अवैध साठवणुक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

प्रस्तूत प्रकरणी, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात तपासी पोलिस अधिकारी यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, मे. मेट्रो ट्रेडिंग कंपनीचे मालक नरेंद्रकुमार नेमीचंद संचेती यांच्याकडे असलेल्या गव्हाची अधिक चौकशी केली असता, दिनांक २७/०९/२०१२ रोजी त्यांनी फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एफ.सी.आय.) बोरीवली मुंबई यांच्याकडून एकूण ९ मेट्रीक टन गहू त्यामध्ये प्रत्येकी ५० किलो वजनाच्या एकूण १८० गोण्या या १,३२,३९० रुपयास विकत घेतल्या असून सदरचा माल हा जास्त जुना व खराब असल्याने साफसफाई करण्यासाठी अेस इंटरनॅशनल कंपनीत देण्यात आले असल्याचे सांगितले. तसा त्याचा सविस्तर जबाब नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गव्हाबाबतची अेस इंटरनॅशनल कंपनीत खात्री केली असता सदर कंपनीमध्ये प्रत्येकी ५० किलो वजनाच्या एकूण १८० गोण्याची बिले मिळून आली, असे नमूद आहे.

तथापी, मे. मेट्रों इंटरनॅशनलचे मालक यांनी निवेदनासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, भारतीय खाद्य निगम यांचेकडील वितरण आदेश क्र. १६१२१ दिनांक ११/०९/२०१२ अन्वये ९ मे. टन खुल्या बाजारातील गव्हाचा साठा मे. मेट्रो इंटरनॅशनल यांनी खरेदी केल्याबाबतची नोंद दिसून येते. परंतु सदर वितरण आदेशामधील अट क्र. २ मध्ये खरेदीदाराने रिलिज ऑर्डर सादर केल्या खेरीज त्यांना साठा वितरीत करु नये. तसेच अट क्र. ३ मध्ये वितरण आदेशाची मुदत दिनांक १८/०९/२०१२ असल्याची नमूद आहे. तथापी, सदर रकान्यामध्ये दिनांक १८/०९/२०१२ रोजीच्या तारखेस वर्तूळ करुन त्या शेजारी दिनांक २७/०९/२०१२ असे नमूद असून सदर दर्शविलेल्या फेरफार हे संबंधित अधिकाऱ्यांनी स्वाक्षरीसह प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही. तसेच या कागदपत्रांसोबत भारतीय खाद्य निगमचे रिलीज ऑर्डर, गेट पास अथवा इतर दस्तऐवज सादर केले नसल्याने या वितरण आदेशामधील नमूद गव्हाच्या साठ्याची खरेदीदाराने उचल केली किंवा कसे ? अथवा उचल केली असल्यास, उचलीच्या तारखेबाबत बोध होत नाही. त्यामुळे सदरचा उचल केलेला साठा नमूद गोदामात साठवणूक केल्याचे दिसून येत नाही. तसेच त्यासोबत मे. अेस इंटरनॅशनल यांचे मटेरियल रिसीप्ट नोंट क्र. १२९८ दिनांक २७/०९/२०१२ अन्वये मे. मेट्रो इंटरनॅशनल यांनी प्रति ५० किलो भरतीच्या १८१ बाचक्यांमधील ९२७९ किलो गव्हाचा साठा ट्रक क्र. एमएच-०४-ईल-८९७ द्वारे प्राप्त झाल्याचे नमूद आहे. मे. मेट्रो इंटरनॅशनल यांनी खरेदी केलेला गव्हाचा साठा हा ५० किलो क्षमतेच्या भारतीय खाद्य निगम यांच्या ज्युट बारदानाच्या गोण्यांमधील असल्याची या कार्यालयाची धारणा आहे. परंतू सदर प्रकरणी पथकाने टाकलेल्या धाडीत नमूद वेअरहाऊसमध्ये प्रति ३० किलो भरतीच्या ३२० बाचक्यांमधील ९६ क्विंटल प्लास्टिक बारदानामधील गव्हाचा साठा जप्त केला आहे. म्हणजेच मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक हे भारतीय खाद्य निगम यांचे वितरण आदेश सादर करुन जप्त गव्हाचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे भासवून खोटा दावा या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे संकृतदर्शनी दिसून येत असल्याने जप्त गव्हाचा साठा हा गैरमार्गाने खरेदी करुन अवैध साठवणुक केल्याचे सिध्द होत आहे.

उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील पुरावादर्शक कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. अेस इंटरनॅशनलचे मालक पंकज ठक्कर यांनी नमुद गोदामावर अन्नधान्य साफसफाईची प्रक्रिया होत असल्याचे सांगितले. सदर प्रकरणी गोदामात जप्त केलेला तांदुळ व गव्हाचा साठा हा त्यांच्या मालकीचा नसल्याचे सांगुन केवळ धान्याची पत राखण्यासाठी साठामालकांनी त्यांचा साठा साफसफाई करीता पाठविला असल्याचे सांगुन या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते. सदर प्रकरणी जप्त तांदळाच्या साठयाबाबत मे. गजानन ट्रेडींग कंपनीचे मालक श्री: अशोक परशुराम तुपे यांनी प्रामाणिकपणे खुलासा सादर करुन सदर साठयाशी



CONTROLLER OF RATION... HE... M...

त्यांचा काहीएक संबंध नसल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने तपासी पोलिस अधिकारी यांनी केलेल्या पुढील तपासात गोदामात जप्त असलेला तांदळाचा साठा हा मे. अेस इंटरनॅशनलचे मालक पंकज ठक्कर व कानजीभाई बच्चू रावरीया यांनी मिळून शालेय पोषण आहार योजनेचा मे. पटेल वेअर हाऊस येथील ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केल्याचे सिध्द झाले आहे. तसेच मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक हे भारतीय खाद्य निगम यांचे वितरण आदेश सादर करुन जप्त गव्हाचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे भासवून खोटा दावा करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सदर गव्हाचा साठा हा मे. मेट्रो इंटरनॅशनल यांच्या मालकीचा असल्याबाबतचा दावा फोल ठरला असुन मे. अेस इंटरनॅशनलचे मालक यांनी सदर गव्हाचा साठा हा शासननियंत्रीत दराचा पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाचा साठा गैरमार्गाने खरेदी करुन तो साठा त्यांनी प्लॅस्टिकच्या बारदानमध्ये भरुन खुल्या बाजारातील भासविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते. मे. अेस इंटरनॅशनलचे मालक पंकज ठक्कर व त्यांचा साथीदार कानजीभाई बच्चू रावरीया तसेच मे. इस्कॉन फुडसूचे व्यवस्थापक परती नामे इसम हे संराईत गुन्हेगार असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदळाचा साठा व शासननियंत्रीत दराचा गव्हाचा साठा त्यांनी गैरमार्गाने खरेदी करुन शालेय विद्यार्थी तसेच गोरगरीब शिधापत्रिकाधारक यांना देय असलेल्या अन्नधान्यापासुन त्यांना वंचीत ठेवून घोर फसवणुक केल्याचे सिध्द होत आाहे. सबब, मे. अेस इंटरनॅशनल या गोदामात जप्त असलेला तांदुळ व गव्हाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये तुर्भे पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३११२/२०१२, दिनांक ०३/११/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात राहून पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला तांदुळ व गव्हाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला सदर तांदुळ व गव्हाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने त्यांचे कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी उपरोक्त तांदुळ व गव्हाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या पुढील महिन्याच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. अेस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर
२) मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक/भागीदार/व्यवस्थापक
३) मे. गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक/भागीदार/व्यवस्थापक
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे सात दिवसांचे आत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा. सदरच्या कार्यवाहीस विलंब होऊन तांदुळ व गव्हाचा साठा खराब झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर राहील याची नोंद घ्यावी.
३) कार्यासन अधिकारी, का.क्र. २, मागणी शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.